नियमीत फौजदारी खटला क्र. **१२१/२०२५**
निशाणी क्र. **७५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रविण जनार्दन पेडणेकर** |
| वय सुमारे | : | ५१ वर्षे, व्यवसाय : ज्वेलरीचे दुकान |
| निवासस्थान | : | मु. कुंभारवाडा, उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती स्नेहा नाईक यांचेमार्फत</u>**:

माझा ज्वेलरीचा व्यवसाय आहे. माझ्या भावाचे नाव सुनिल जनार्दन पेडणेकर असे आहे. त्याची मुलगी सायली सुनिल पेडणेकर ही घटनेच्या वेळी एल.एल.बी.च्या पहिल्या वर्षात गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, चर्चगेट, मुंबई येथे शिकत होती.

०२. दि. ०४/०३/२०१० रोजी घटना घडली. सायली सकाळी ०८:३० वाजता कॉलेजला जायची व दुपारी १:३० वाजेपर्यंत घरी परत यायची. तिला एक अनोळखी नंबरवरुन २—३ वेळा कॉल आला होता. तो कॉल मयुर घरत याचा होता. तो तिला सांगत होता की, तू माझ्याबरोबर प्रेमसंबंध ठेव व नाही ठेवलेस तर मी तुला बरबाद करीन. ही गोष्ट माझा भाऊ सुनिल पेडणेकर याला समजली. त्यावेळी सायं. ८:३० वाजता आम्ही मयुर घरत याला जाब विचारण्यासाठी गेलो. त्यावेळी मी स्वत:, सुनिल पेडणेकर, महेश बालदी, आचल मुकादम व गणेश पाटील असे आम्ही त्याला जाब विचारण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी मयुर घरत, त्याचे वडील काशिनाथ घरत व आई नुतन घरत हे आम्हाला बाहेरच असलेल्या मेडीकल स्टोअर्सजवळ भेटले. भाऊ सुनिल

पेडणेकर याने मयुरला जाब विचारला की, तू असे का केलेस? त्यावर मयुर, त्याचे आईवडील हे जोरजोरात ओरडून आम्हाला आईवडीलांवरुन शिवीगाळ करु लागले. सुनिल पेडणेकर याने त्याला शांत राहण्यास सांगितले. तर तो धावत मेडीकल स्टोअर्समध्ये गेला व सुरी आणून मला, माझा भाऊ व सर्वांना जीवे मारण्याची धमकी देवू लागला. आम्ही मयुरला पकडण्याचा प्रयत्न केला परंतु तो धावू लागला व रस्त्यावर जावून पडला. त्यानंतर आम्हाला समजले की तो हॉस्पीटलमध्ये ॲडमीट आहे. सुनिल पेडणेकर याने पोलीस ठाण्यात जावून तक्रार दाखल केली. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. आरोपी व त्याच्या आईवडीलांनी आम्हा सर्वांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकुश मोरे यांचेमार्फत</u>** :

०३. हे मला माहीत नाही की, सन २०१० साली महेश बालदी हे उरणचे नगराध्यक्ष होते. महेश बालदी यांना मी माझ्या लहानपणापासून शाळेपासून ओळखतो. हे मला माहीत आहे की, महेश बालदी हे भारतीय जनता पक्षाचे पूर्वीपासून कार्यकर्ते आहेत. माझा भाऊ व महेश बालदी हे वर्गमित्र होते.

०४. दि. ०४/०३/२०१० रोजी आम्ही सायलीला सोबत जाब विचारण्यासाठी घेवून गेलो नव्हतो. जाब विचारायला जाण्यापूर्वी मी स्वत: सायलीशी वैयक्तीक बोललो होतो. सन २०१० साली सायली एल.एल.बी. च्या पहिल्या वर्षात शिकत होती. त्यावेळी आरोपी मयुर हा इंजिनियरिंग करत होता. हे म्हणणे खरे आहे की, गव्हर्नमेंट लॉ कॉलेज हा फक्त लॉ कॉलेज आहे व

तिथे इंजिनियरिंगचे कोणतेही वर्ग नाहीत. मयुर कोठून इंजिनियरिंग करत होता हे मला माहीत नाही. घटनेपूर्वी मी आरोपी मयुर याला पाहिले होते. आरोपी हा उरण मधीलच आहे व उरण हे छोटे शहर आहे त्यामुळे मी त्याला पूर्वीपासून ओळखतो. आरोपी ज्या बिल्डींगमध्ये राहतो ती बिल्डींग मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०४/०३/२०१० रोजी आम्ही आरोपीला त्याच्या घरी जावून भेटलो नव्हतो. जाब विचारण्यासाठी आम्ही महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम यांना ते आमचे मित्र असल्यामुळे सोबत घेवून गेलो होतो. त्यावेळी महेश बालदी काय काम करत होते हे मला माहिती नाही. गणेश पाटील, आचल मुकादम काय काम करत होते हे मला माहीत नाही. महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम यांच्याशी आमची दररोज भेट होत होती. आम्ही त्या तिघांना विचारले नव्हते की, त्यांचे उपजिवीकेचे काय साधन आहे. हे म्हणणे खरे नाही की, महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम हे गुंड प्रवृत्तीचे असून त्यांना फक्त आरोपीला मारण्यासाठी व धमकावण्यासाठी घेवून गेलो होतो.

०५. हे म्हणणे खरे आहे की, ओंकार मेडीकल स्टोअर्स हे उरण शहरात आहे. आम्ही ज्यावेळी तेथे गेलो त्यावेळी मेडीकल स्टोअर्सच्या आत मेडीकलवाला आत उभा होता. आमची बोलाचाल मेडीकलच्या समोर झाली होती. मी सुरी स्वत: पाहिली होती. ती सुरी साधारणपणे आठ ते दहा इंच लांब होती. माझ्या हे लक्षात नाही की, मेडीकलवाला भांडण सोडवण्यास आला होता अथवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर रहदारी होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या रहदारीमधील कोणीही भांडण सोडवण्यासाठी आले नाही.

मयुरला कुठे कुठे लागले हे मला माहीत नाही. मला हे माहीत नाही की, त्यानंतर मयुर बरेच दिवस हॉस्पीटलमध्ये ॲडमीट होता. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझा भाऊ व महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम यांना कुठेही लागले नाही. हे मला माहीत नाही की, मयुरच्या आईवडीलांचे वय त्यावेळेला ५० ते ५५ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा भाऊ व महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम यांनी मयुरला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यावर केस होवू नये म्हणून माझ्या भावाने खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुतणीला कोणत्याही प्रकारची विचारपूस केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, धाक दाखवण्यासाठी आरोपीला आम्ही मारहाण केली होती.

०६. आरोपीची व सायलीची भेट कशी झाली होती यासंदर्भात जाब विचारेपर्यंत मला माहिती नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही शहानिशा न करता जावून मयुरला मारहाण केली होती व त्याच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मयुरने मला वैयक्तीक कोणतीही धक्काबुक्की केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी आरोपी मयुर एकटा होता व आम्ही पाच जण त्याला मारहाण करत होतो. माझा जबाब पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जबाब देताना मयुरच्या आईवडीलांनी धक्काबुक्की व शिवीगाळ केली असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझा जबाब नोंदवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पाच जणांनी मिळून मयुरला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मयुर

आमच्याविरुद्ध फिर्याद देणार होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमच्याविरुद्ध फिर्याद देईल म्हणून आम्ही त्याच्याविरुद्ध खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०३/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.